## महत्त्वाचे

### सथ्था कॉलेजच्या २३ विद्यार्थ्यांची निवड

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** आबासाहेब काकडे शैक्षणिक समुहाच्या एन. एन. सथ्था कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये मायलान लॅबोरेटोरीज लिमिटेड या प्रतिष्ठित बहुराष्ट्रीय कंपनीतर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाद्वारे अंतिम वर्षात शिकत असलेल्या २३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे सचिव ॲड. शिवाजीराव काकडे यांनी दिली. या निवड प्रक्रियेमध्ये अत्यंत काटेकोर आणि स्पर्धात्मक टप्प्यांचा समावेश होता. ज्यामध्ये लेखी चाचणी, गटचर्चा आणि वैयक्तिक मुलाखतीचा समावेश होता. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीच्या नाशिक, इंदूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील शाखांमध्ये क्वालिटी अशुरन्स, क्वालिटी कंट्रोल आणि प्रॉडक्शन विभागात नोकरी देण्यात येणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विशाल पांडे यांनी सांगितले, विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल करिअरसाठी अशा स्वरूपाचे रोजगाराभिमुख उपक्रम हे अत्यंत महत्त्वाचे ठरतात. उद्योग क्षेत्राच्या गरजेनुसार विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे तयार करण्यासाठी कॉलेज सातत्याने प्रयत्नशील आहे. या उपक्रमासाठी मायलान (विआत्रीस) लॅबोरेटोरीज कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापक .रोहन कुलकर्णी, वरिष्ठ व्यवस्थापक प्रियब्रता दाश व मानव संसाधन विभागाचे व्यवस्थापक श्रीहरी कावरे यांनी विशेष प्रयत्न केले.

### अपघातग्रस्ताला केली आर्थिक मदत

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** लक्झरी व स्कूल बस बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने शहरात एका अपघातग्रस्त चालकास वैद्यकीय मदत देऊन त्याला आधार देण्यात आले. नांदेड येथील सतीश संग्राम काळे (वय ३४) या चालकाचा अपघात झाल्याने त्याच्यावर शहरातील खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. त्याच्या आर्थिक परिस्थितीमुळे उपचाराचा खर्च पेलवणे कठीण झाले असतानाच, अहिल्यानगर स्कूल बस संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मदतीचा हात पुढे करून माणुसकीचा हात दिला. काळे आणि त्याचा सहकारी शंकर विठ्ठल चव्हाण (वय ३०) यांचा वाहन अपघात झाल्याने त्यांना गंभीर दुखापती झाल्या. त्यानंतर दोघांनाही शहरातील खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. काळेवर उपचार सुरू असताना हॉस्पिटलचे बिल ७६ हजार ८०० रुपये झाले. मात्र, त्याच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे उपचाराचा खर्च भरता येणे कठीण झाले. नगर लक्झरी व स्कूल बस बहुउद्देशीय संस्था ही प्रवाशांसह शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी कार्यरत असलेली संस्था असून या संस्थेतील चालक-मालक केवळ व्यवसायापुरते मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी जपताना दिसत आहेत. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अपघाताची माहिती मिळताच तत्काळ हॉस्पिटल गाठून हॉस्पिटल प्रशासनासोबत चर्चा केली, तसेच केवळ १० हजार काळेला डिस्चार्ज देण्यासाठी मदत केली.

### हल्ला करणाऱ्यांना अटक व्हावी

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** गजराज नगर येथील मागासवर्गीय युवकावर जुन्या वादातून जीवघेणा हल्ला करणाऱ्या आरोपींना अटक करुन त्या मागील मुख्य सूत्रधाराचा शोध घेत गुंड प्रवृत्तीच्या टोळीवर कठोर कारवाई करण्याची मागणी स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष नाथाभाऊ आल्हाट यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी सूर्यवंशी प्रतिष्ठानचे अध्यक्ष बबलू सूर्यवंशी, भाऊसाहेब आल्हाट, बबलू सूर्यवंशी, सुरज कांबळे, अक्षय कांबळे, अभिजीत माने, मोहन जठाडे, छावा शिरसाठ, भागवत शिंदे, शाम शिंदे आदी उपस्थित होते.

### अष्ट गीताव्रतींचा विशेष सन्मान

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** कल्याणम् सामाजिक प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने अष्ट गीताव्रतींचा विशेष सन्मान करण्यात आला. शृंगेरी मठाचेशंकराचार्य यांनी घेतलेल्या भगवद्गीता मुखोद्गत पठण परिक्षेत विशेष प्राविण्य प्राप्त गीताव्रतींना सुवर्ण पदकाने सन्मानित करण्यात आले. गीता परिवारातील भगिनींच्या सत्कार सोहळ्यात सुनंदा सोमाणी, शुभदा गोडबोले, विद्या भालेराव, मीना पडवळ, छाया पडवळ, मंगल वैद्य, शोभा सुपेकर व हरिप्रिया खंडेलवाल या अष्ट भगिनींचा समावेश होता. यावेळी हभप दळवी महाराज, संगीत क्षेत्रातील कुमूदिनी बोपर्डीकर, संस्कृत अध्यापिका रेणुका मुळे, तसेच निलम तरवडे, प्रज्ञा जोशी, माधुरी नाईक व अनुपमा काळे आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आले. प्रास्ताविक सचिव श्रीकांत नाईक यांनी केले. अध्यक्ष डॉ. अशोक काळे यांनी प्रतिष्ठानाच्या प्रस्तावित उपक्रमांविषयी माहिती दिली. यशवंत आंबेकर यांनी सूत्रसंचलन केले. आभार शिरीष कुलकर्णी यांनी मानले.

### निंबळक रस्त्यांची झाली चाळण

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** नगर- पुणे महामार्ग ते निंबळक बायपासला जोडणाऱ्या एमआयडीसी रस्त्याची चाळ झाली आहे. या ठिकाणी रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. गेल्या चार ते पाच वर्षापूर्वी एमआयडीसी प्रशासनाने या रस्त्याचे काम केलेले आहे. त्यावेळी अनेक वर्षे या रस्त्याचे काम रखडले होते. त्यानंतर कसाबसा पूर्ण झालेल्या रस्त्याची आता मोठी दुरावस्था झालेली आहे. या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. अनेक ठिकाणी लावण्यात आलेले गतीरोधक पूर्णपणे उखडले असून रस्त्यावर पावसाचे पाणी साठल्यानंतर त्यातून जातांना दुचाकीस्वारांचे अपघात होतांना दिसत आहेत. या शिवाय रात्रीच्या वेळी या रस्त्यावरून अवजड वाहतूक सुरू आहे. यामुळे एमआयडीसी प्रशासनाने या रस्त्याची दुरूस्ती करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

### रेल्वे कर्मचाऱ्यांचे रक्तदान शिबिर

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** नेशनल रेल्वे मजदूर यूनियन नगर शाखेच्या वतीने नगर रेल्वेस्थानक परिसरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन विजय सालुंखे व बेणी प्रसाद मीणा, सचिव राहुल पंडित आणि अहमदनगर इंजिनिअरिंग ब्रँचचे सहाय्यक सचिव ऋषिकेश मीणा, तसेच अजयकुमार चौबे यांच्या सहकार्याने करण्यात आले. शिबिरात तब्बल १०५ युनिट रक्तदान झाले. यावेळी विविध विभागांचे इंचार्ज उपस्थित होते आणि त्यांच्या सक्रिय सहभागामुळे हे रक्तदान शिबिर यशस्वी झाले. या उपक्रमामुळे समाजात मानवतेचा संदेश पोहोचविण्यासोबतच गरजू रुग्णांना मोठा आधार मिळणार आहे. या शिबिरात तरुणांबरोबर महिलांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत रक्तदान केले. यावेळी विजय सालुखे, ऋषिकेश मिना, श्रवण कुमार, राहुल पंडित, संजय झा, रोहित कसबे, तनीश तलोले, अमजद पठाण दिनेश चावडे, अंकित कुमार, देवीप्रसाद उपस्थित होते.

### वन महोत्सवाच्या वृक्षलागवड शुभारंभ

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** पिंपळगाव उज्जैनी येथे हरितक्रांतीचे दुसरे पर्व सुरू झाले असून या उपक्रमामुळे परिसरातील जैवविविधतेमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होणार असल्याचे प्रतिपादन सन फार्मा कंपनीचे साईटहेड अभिजीत भाकड यांनी केले. नवजीवन प्रतिष्ठान समन्वयीत व सन फार्मास्यूटिकल इंडस्ट्रीज लिमिटेड अर्थसहाय्यित या वन महोत्सवाच्या वृक्षलागवड शुभारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी दादासाहेब पाटील, डॉ. महेश पाठक, संभाजी पाटील, ऋतुराज आल्हाट, अरुण आढाव,भगवान आढाव, उज्जैनी माता विद्यालयातील स्टाफ, सैनिक संघटनेचे पदाधिकारी व पिंपळगाव उज्जैनी ग्रामस्थ उपस्थित होते.

# शासकीय समित्यांवरील नियुक्त्या रखडल्या

## महायुतीतील तीन पक्षांचा मेळ बसेना; ३० जूनची होती डेडलाईन, आता ऑगस्ट उजाडला

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** जिल्हा व तालुकास्तरावरील विविध शासकीय समितीवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्यांची प्रक्रिया ३० जूनपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश होते. परंतू आता ऑगस्ट महिना उजेडणार असून अद्यापही या नियुक्त्या झालेल्या नाहीत. महायुतीमधील तीन पक्षांमध्ये मेळ बसत नसल्याने या नियुक्त्या रखडल्याचे सांगण्यात आले. शासकीय समित्यामधील या नियुक्त्या करतांना महायुतीच्या नेत्यांची डोकेदुखी वाढली आहे. समित्यावर नियुक्तीचा फार्म्यूला ठरला होता. पण सरकारमधील घटक पक्षांसाठी अन्याय ठरत आहे.

सत्ताधारी महायुतीसाठी शासकीय समित्यावरील अशासकीय सदस्य नियुक्त्याची प्रक्रियाने डोकेदुखी कमी होणार की वाढणार? शासकीय समित्यासह विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून देखील नियुक्ती करण्यात येणार आहे. २०१४ मध्ये भाजप सत्तेमध्ये असून या नियुक्त्या झाल्या नव्हत्या. २०१९ मध्ये देखील महायुतीचे सरकार आल्यानंतर देखील अडीच वर्ष या नियुक्त्या झाल्या नाही. आता तरी महायुतीची सत्ता आल्याने या नियुक्या होणार का असा प्रश्न कार्यकर्त्यांना पडला आहे. महायुतीतील आमदाराच्या पक्षाला ६० टक्के समितीवरील नियुक्तीच्या जागा मिळणार तर त्या पक्षाबरोबर असलेल्या घटक पक्षांना प्रत्येकी २० टक्के समितीच्या जागा दिल्या जाणार आहेत. त्यामुळे घटक पक्षावर हा अन्याय होणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. ज्या मतदारसंघात राष्ट्रवादी अजित पवार गटाचा आमदार आहेत. त्यात पक्षाला ६० टक्के जागा समित्यांवर मिळणार तर घटक पक्ष असलेल्या भाजप व शिवसेना शिंदे गटाला प्रत्येकी २० टक्के जागा मिळणार आहे. त्यामुळे या मतदारसंघात घटक पक्षाची ताकद कितीही मोठी असली तरी त्यांना २० टक्के जागा मिळणार आहे. त्यामुळे त्या पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये नाराजी वाढणार असल्याचे दिसत आहे. त्यातही तिन्ही पक्षाचा मेळ घालतांना नेत्यांची चांगलीच दमछाक होत आहे. तालुकास्तरीय समितीमध्ये सहाजिकच आमदारांच्या पक्षाचे वर्चस्व राहणार आहे. परिणामी घटक पक्षाच्या नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची कोंडी होण्याची शक्यता आहे.

समित्यावर नियुक्तीबाबत भाजप तर वेगळाच निकष लावणार आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत बुथनिहाय भाजप उमेदवाराला पडलेल्या मतांनुसार त्या बुथमधील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची समित्यावर वर्णी लागणार की नाही लागणार हे ठरविण्यात येणार आहे. त्यामुळे काही विधानसभा मतदारसंघातील नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते चांगलेच धास्तावले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी या नियुक्त्या होणार असा प्रश्न कार्यकर्त्यांना पडला आहे. ३० जूनपर्यंत नियुक्त्या करण्याचे आदेश होते. मात्र जुलै महिना संपत आला तरी नियुक्त्या काही होतांना दिसत नाही.

### तालुकास्तरीय शासकीय समित्या

- भ्रष्टाचार निर्मूलन समितीसमन्वय व पुनर्विलोकन समिती, अवैद्य दारू प्रतिबंध समिती, शांतता समिती व्यसनमुक्ती समिती, क्रीडा संकुल समिती, संजय गांधी निराधार अनुदान समिती, पशु गणना समन्वय व सनियंत्रण समिती, शेतकरी समन्वय समिती, बाल संरक्षण समिती, जलसाक्षरता समिती, आजी-माजी सैनिक समिती, नगरपालिका दक्षता समिती, रेतीघाट तांत्रिक समिती, तालुका तंटामुक्ती समिती, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन समिती, जलयुक्त शिवार अभियान आढावा समिती, वेठबिगार निर्मूलन दक्षता समिती, विशाखा समिती, राजीव गांधी गतिमान प्रशासन समिती, रोजगार हमी योजना समिती, तक्रार निवारण समिती, विद्युत वितरण नियंत्रण समिती, रुग्ण कल्याण समिती.

# दिल्लीगेट मारहाण; खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** मागील भांडणाच्या कारणावरून न्यायालयाने शिक्षा ठोकवल्याच्या कारणावरुन १५ ते २० जणांनी आठजणांना घातक शास्त्राने मारहाण करून खूनाचा प्रयत्न केल्याची घटना २४ जुलै रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास शिशु संगोपन शाळा चितळे रोड, गोवा देव मंदिर शेजारी दिल्लीगेट मालेगाव येथे घडली.

याबाबत रोहन जयेंद्र चव्हाण (वय २७ रा. मुन्सिपल कॉलनी दिल्ली गेट) याने तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. पवन दीपक पवार, शिवम दीपक पवार, आदित्य लहू सकट, आदर्श रमेश साळवे, हर्षल लक्ष्मण सारसर, अमोल उर्फ भैय्या मोरे, किरण बापू झरे, चेतन रवींद्र निदाने, राहुल अंबादास रोहकले, आयान शेख, प्रदीप पवार (राहणार मुन्सिपल कॉलनी नालेगाव), प्रशांत प्रदीप दळवी (वारुळाचा मारुती नालेगाव), गणेश संतोष भुजबळ (दातरंगे मळा, नालेगाव) अनोळखी पाच ते सहा यांनी मागील भांडणाच्या कारणावरून न्यायालयात झालेल्या शिक्षेच्या कारणावरुन लोखंडी रॉड, लाकडी दांडगे व धारदार शस्त्रे घेऊन फिर्यादी यांच्या कुटुंबीयांवर हल्ला करुन शिवीगाळ दमदाटी करीत बेदम मारहाण करुन खुनाचा प्रयत्न केला. या मारहाणीत फिर्यादी, फिर्यादीची आत्या, फिर्यादीचे चुलते जितेंद्र चव्हाण, प्रियंका कांबळे फिर्यादीची पत्नी नीलम चव्हाण अनिता चव्हाण देवयानी हंस संगीता दीपक पवार हे गंभीर जखमी झाले. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात रोहन चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन १५ ते २० जणांविरुद्ध पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गोटला हे करत आहेत.

# महसूलमध्ये ऑगस्टपासून फेसअ‍ॅप प्रणाली

## सप्टेंबरचा पगार फेन्सिंग सिस्टमनुसारच निघणार

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** जिल्हाधिकारी कार्यालयात १ ऑगस्टपासून महसूल कर्मचाऱ्यांसाठी फेसअ‍ॅप आणि जिओ-फेन्सिंग सिस्टमचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. महसूल विभागाच्या सुत्रांकडून याबाबत माहिती देण्यात आली असून या नवीन प्रणालीमुळे फेसअ‍ॅपवर नोंदणीकृत कर्मचाऱ्यांनाच ऑगस्ट महिन्यांचा पगार मिळेल, जो सप्टेंबरमध्ये वितरित केला जाणार आहे.

राज्य सरकारच्या महसूल विभागाकडून याबाबत घोषणा करण्यात आली होती. प्रशासनात अधिक पारदर्शकता, कार्यक्षमता आणि जनता-केंद्रित दृष्टिकोन आणण्याच्या उद्देशाने सरकारच्या निर्देशानुसार हे पाऊल उचलण्यात आले आहे. डिजिटल उपस्थिती साधनांचा परिचय हा स्मार्ट प्रशासनाकडे महसूल विभागाचे हे पाऊल पुढे टाकणारा आहे. फेसअ‍ॅप, जिओ-फेन्सिंगसह एकत्रित, नियुक्त केलेल्या कार्यालयीन ठिकाणांमधून प्रत्यक्ष उपस्थितीचे काटेकोरपणे निरीक्षण करत येणार आहे. नगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व प्रथम या प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. याबाबत सुत्रांच्या माहितीनूसार १ ऑगस्टपासून जिल्हाधिकारी कार्यालयात आणि याबाबत सरकारकडून आदेश आल्यानंतर जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयात हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. या प्रणालीत कार्यालय हजेरीसाठी फेसअ‍ॅपमुळे कर्मचाऱ्यांची कार्यालयातील उपस्थिती काटेकोरपणे तपासता येणार आहे. तसेच ऑगस्टमध्ये लागू करण्यात करण्यात येणाऱ्या या प्रणालीनूसार सप्टेंबर महिन्यांचा पगार काढण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# कृषी व्यापारासाठी नगरमध्ये ड्राय पोर्ट कन्सेप्ट राबवा

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसची उपमुख्यमंत्री ना. पवार यांच्याकडे मागणी

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – नगर शहरात कृषी उत्पादनांचा व्यापार वाढीसह, एमआयडीसीच्या विकास आणि युवकांना रोजगार मिळण्याच्या उद्देशाने ड्राय पोर्ट कन्सेप्ट राबविण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांच्याकडे करण्यात आली.

राष्ट्रवादी युवकचे शहर जिल्हाध्यक्ष इंजिनिअर केतन क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री ना. पवार शहरात आले असता त्यांची भेट घेऊन आ. संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली या संदर्भात निवेदन दिले. यावेळी युवक प्रवक्ता किरण घुले, दीपक वाघ, विधानसभा अध्यक्ष सुमित कुलकर्णी, केतन गोरे, रोहित सरना, मंगेश शिंदे, सुदर्शन गोरे, हृषीकेश जगताप, गौरव हरबा, राजू मकासरे, कुणाल ससाणे, सचिन डेरे, स्वप्नील कांबळे, ओंकार मिसाळ, बोगवत, आशुतोष पानमळकर, अरबाज शेख, कृष्णा शेळके, अमित बडे, प्रवीण खंडागळे, पंकज शेंडगे आदी उपस्थित होते.

नगर जिल्हा हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने मोठा व कृषी उत्पादनामध्ये अग्रेसर आहे. जिल्ह्यात तीन एमआयडीसी असल्याने विविध कृषी पिकांचे उत्पादने निर्यात करण्यासाठी मोठा वाव आहे. परंतु दळणवळणाला पुरेश्या सुविधा नसून, मालाच्या दळणवळणासाठी मोठा खर्च येतो. वाहतुकीला वेळ जास्त लागत असल्याकारणाने नाशवंत माल निर्यात करण्यास अडचणी येतात. त्यामुळे कृषी व औद्योगिक क्षेत्राच्या वाढीस चालना मिळत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

या समस्येवर उपाय म्हणून अहिल्यानगर शहरासाठी ड्राय पोर्ट ही संकल्पना राबविल्यास शेती मालाची योग्य प्रकारे साठवणुक करुन त्याचे इतर राज्यात व परदेशात विक्रीसाठी घेऊन जाता येणार आहे. यामुळे जिल्ह्यातील कृषी व औद्योगिक क्षेत्रात अमुलाग्र बदल होऊ शकतो आणि अनेक युवक-युवतींना रोजगार मिळू शकणार असल्याचे म्हटले आहे.

# लॉयर्स सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–**अहिल्यानगर शहरातील कौटुंबिक न्यायालय व कौटुंबिक न्यायालय वकील संघाच्या वतीने लॉयर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे नवनिर्वाचित चेअरमन ॲड. लक्ष्मण कचरे व व्हाईस चेअरमन ॲड. संदीप पाखरे यांचा सत्कार करण्यात आला.

कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश संगिता ना. भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी कौटुंबिक न्यायालयाचे उपाध्यक्ष तथा विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, सचिव ॲड. राजेश कावरे, ॲड. प्रकाश गायकवाड, ॲड. एस.पी. गवते, माजी अध्यक्ष ॲड. शिवाजी कराळे, ॲड. राजाभाऊ शिर्के, ॲड. संजय पाटील, ॲड. सखाराम टकले, ॲड. सुदाम गवते, ॲड. संतोष कांडेकर, ॲड. संदीप शेळके, ॲड. यशवंत ठोंबरे, ॲड. प्राजक्ता करांडे, ॲड. विजया कोतकर, ॲड. गौरी सामलेटी, ॲड. आनंद सूर्यवंशी, समुपदेशक अलका राठोड, प्रबंधक सावता मोहोळकर, नाझर असिफ शेख, अर्चना झिंजे आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात उपाध्यक्ष ॲड. लगड यांनी लॉयर्स को ऑपरेटिव्ह सोसायटीची माहिती देऊन वकीलांच्या विविध प्रश्नासाठी नवनिर्वाचित चेअरमन ॲड. कचरे व व्हाईस चेअरमन ॲड. पाखरे सातत्याने प्रश्न मांडून ते सोडविण्याचे काम करत आहे. सूत्रसंचालन ॲड. राजेश कावरे यांनी केले. आभार राजाभाऊ शिर्के यांनी मानले.

# नवउद्योजकांनी मार्जिन मनी योजनेचा लाभ घ्यावा

## सामाजिक न्याय विभागाचे आवाहन

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील १८ वर्षांवरील नवउद्योजकांसाठी मार्जिन मनी उपलब्ध करून देण्याची योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सामाजिक न्याय विभागाचे सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी केले आहे.

या योजनेंतर्गत महाराष्ट्रातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील सवलतीस पात्र १८ वर्षांवरील नवउद्योजकांनी १० टक्के स्व-हिस्सा भरणा केल्यानंतर आणि राष्ट्रीयीकृत बँकेने स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत ७५ टक्के कर्ज मंजूर केल्यानंतर, उर्वरित १५ टक्के प्रकल्प मूल्याचे अनुदान राज्य शासनामार्फत देण्यात येते. ही योजना फक्त नव्याने उद्योग सुरू करणाऱ्या व्यक्तींना लागू असून, १० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंत कर्ज या योजनेद्वारे घेता येते. अर्जदार मुदत कर्ज किंवा खेळते भांडवल कर्ज यापैकी एक किंवा दोन्ही प्रकारचे कर्ज घेऊ शकतो. प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ७५ टक्क्यांपर्यंत कर्ज बँकेमार्फत मिळू शकते. योजनेच्या अटींनुसार किमान १० टक्के रक्कम अर्जदाराने स्वतःच्या निधीतून गुंतवावी लागते, असे सामाजिक न्याय विभागाकडून सांगण्यात आले.

# नगरमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊंचा पुतळा उभारण्यात यावा

## दलित आघाडीच्यावतीने उपमुख्यमंत्री पवार यांना निवेदन

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** मातंग समाजाच्या अस्मितेचे प्रतीक आणि वंचित, शोषित, पीडित जनतेचे आवाज ठरलेले लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची उभारणी व्हावी, अशी मागणी भाजप दलित आघाडीच्यावतीने अध्यक्ष सरचिटणीस राजेंद्र लक्ष्मण घोरपडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

यावेळी माजी नगरसवेक मनेश साठे, भाजप अनुसुचित जातीचे उपाध्यक्ष सुनिल सकट, राष्ट्रवादी शहर उपाध्यक्षा शितल गाडे, राष्ट्रवादी शहर उपाध्यक्ष सुनिता कांबळे, सामाजिक न्याय शहर उपाध्यक्ष येशुदास वाघमारे, येशुदास विठ्ठल उमाप, पोपट पाथरे, पांडुरंग घोरपडे, अशोक भोसले, सागर रोकडे, सनी कांबळे, येशुदास भारस्कर आदी उपस्थित होते. यावेळी दिलेल्या निवेदनात त्यांनी स्पष्ट केले, नगरसह संपूर्ण महाराष्ट्रात मातंग समाजाच्या हक्कांसाठी आणि सांस्कृतिक जागृतीसाठी अण्णाभाऊ यांनी प्रचंड कार्य केले. त्यांचे विचार, कथा आणि लोकशाहीराची ताकद आजही समाजाला दिशा देतात. त्यामुळे शहरात त्यांच्या स्मृती जपणारा आणि पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देणारा पूर्णाकृती पुतळा उभा राहणे अत्यंत आवश्यक आहे.

# शासनाच्या आडमुठेपणामुळे कंत्राटदारांवर आत्महत्येची वेळ

## चेअरमन गुंदेचा यांचा आरोप; आंदोलनाचा इशारा

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – सांगली येथील युवा व उभारते कंत्राटदार हर्षल पाटील यांनी केलेल्या कामाचे देयके न मिळाल्याने त्यांनी नुकतीच आत्महत्या केली. शासनाच्या आडमुठेपणामुळे कंत्राटदारांमध्ये नैराश्य आले असून त्यांच्यावर आता आत्महत्येची वेळ आली आहे. जिल्ह्यातील कंत्राटदारांचे शासनाकडे १ हजार २३१ कोटी रुपयांची बिल प्रलंबित आहेत. मार्च महिन्यांत यातील केवळ ७ टक्केच बिल शासनाने अदा केली आहेत. अशा तुटपुंज्या पेमेंटमुळे जिल्ह्यातील ठेकेदारआर्थिक अडचणीत सापडले आहेत. बँकांचे घेतलेल्या कर्जाचे हप्ते थकले असून कामगारांचे पगार करणेही आम्हाला मुश्किल




झाले आहे. आमच्यावरही आत्महत्येची वेळ येऊ शकते. जिल्ह्यातील कंत्राटदारांमध्येही मोठ्या प्रमाणात नैराश्य पसरत आहे. शासनाने त्वरित प्रलंबित देयके देण्यासाठी तरतूद करावी अन्यथा, काम बंद ठेऊन तीव्र आंदोलन करू, असा इशारा बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या नगर सेंटरचे चेअरमन संजय गुंदेचा यांनी दिला आहे.

शासकीय कामाचे पेमेंट न मिळाल्याने सांगली येथील नवोदित युवा कंत्राटदार पाटील यांनी आत्महत्या केली. बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या नगर शाखेच्या वतीने त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शोक बैठकीचे आयोजन करून घटनेचा तीव्र निषेध केला. नगर शाखेचे अध्यक्ष संजय गुंदेचा व माजी अध्यक्ष महेश गुंदेचा यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता भारत बाविस्कर यांना आंदोलनाच्या इशाऱ्याचे निवेदन दिले. बैठकीस अहिल्यानगर सेंटर व्हाईस चेअरमन राहुल शिंदे, सचिन गवारे, कोषाध्यक्ष शिवाजी येवले, रामदास कोल्हापुरे, प्रीतम भंडारी, किरण पागिरे, सचिन भापकर, महेश गायकवाड, पंकज वाघ, श्रीनाथ जिने, योगेश देशपांडे व अमित तोरडमल आदी उपस्थित होते.

# सराईत गुन्हेगार दोन वर्षासाठी हद्दपार

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगारास दोन वर्षासाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले. भिंगार कॅम्प पोलिसांनी त्यास ताब्यात घेत त्याला जिल्ह्याच्या हद्दी बाहेर सोडले. जाबीर सादीक सय्यद रा. शहा कॉलनी गोविंदपुरा, नगर असे या सराईत गुन्हेगाराचे नाव आहेत.

भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक जगदीश मुलगीर यांनी सराईत गुन्हेगार जाबीर सय्यद याचा हद्दपारीचा प्रस्ताव तयार करून उपअधीक्षक अमोल भारती यांच्याकडे पाठविला होता. त्यानंतर पोलीस अधीक्षकांच्या मान्यतेनुसार तो प्रस्ताव उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला होता. २९ जुलै रोजी उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी जाबीर सय्यद याच्या हद्दपारीच्या प्रस्तावास मान्यता दिली. यानंतर भिंगार कॅम्प पोलिसांनी तत्काळ मुकुंदनगर येथून जाबीर सय्यद यास ताब्यात घेतले. कायदेशीर प्रक्रिया पार पडल्यानंतर त्यास जिल्ह्याच्या हद्दी बाहेर सोडण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपअधीक्षक अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर, उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे, पोलीस अंमलदार रेखा पुंड, किरण बर्वे, इसराईल पठाण, पांडुरंग बारगजे, दीपक शिंदे, रवी टकले यांच्या पथकाने केली.